## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-**

१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दि.०१/०३/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१३/२०१२/जा.११३, दिनांक ०३/०३/२०१२, १२/०३/२०१२, १९/०४/२०१२ व ०३/०५/२०१२.

३) मे. श्री सिध्दीविनायक लॉजिस्टिकचे मालक यांचे दि.२९/०२/२०१२ रोजीचे टपालामार्फत प्राप्त निवेदन.

४) मे. श्री सिध्दीविनायक लॉजिस्टिकचे मालक यांचे दि. ०७/०३/२०१२ रोजीचे निवेदन.

५) मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. यांचे दि. २०/०३/२०१२ रोजीचे निवेदन व त्यासोबतचे कागदपत्रे.

६) मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि, मे. परमानंद ॲण्ड सन्स फुड प्रोडक्टस् प्रा.लि व मे. एम.एस.एल. इम्पेक्स प्रा.लि यांचे दि. ०२/०५/२०१२ रोजीचे स्वतंत्र निवेदने व त्यासोबतचे कागदपत्रे.

७) मे. इंडियन अग्रो फुडस् लि. यांचे दि. १४/०५/२०१२ रोजीचे निवेदन व त्यासोबतचे कागदपत्रे

८) मे. ताज अग्रो कमोडिटिज प्रा.लि. यांचे दि. १४/०५/२०१२ रोजीचे निवेदन व त्यासोबतचे कागदपत्रे.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१३/२०१२/जा. ३७
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इशुरस इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : ११ /०६/२०१२.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
सत्यमेव जयते
HEAD OFFICE
MUMBAI

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अवये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक २४/०२/२०१२ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे हे पथकासमवेत डायमंड वेअर हाऊस, प्लॉट नं. डी-२०२, मंगलमुर्ती पेट्रोलपंपाजवळ, दहिसर मोरी, पनवेल रोड, नवी मुंबई या ठिकाणी दुपारी १२.३० वाजता भेट दिली असता डावीकडे असलेल्या एका गोदामामध्ये व उजवीकडे असलेल्या एका गोदामामध्ये कडधान्याचा साठा आंढळून आला. त्यावेळी गोदामात उपस्थित इसमास अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष त्याचे नांव विचारले असता त्याने त्याचे नांव प्रशांत प्रभाकर चांदळे असे सांगुन सदर ठिकाणी ते डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. या कंपनीसाठी लोडींग-

अनलोडींग सर्व्हिस प्रोव्हायडर म्हणुन गेल्या १ वर्षापासुन काम करीत असल्याचे सांगुन वर नमूद कंपनीने इंपोर्ट केलेल्या कडधान्याचा माल साठवणूक करुन कंपनीने दिलेल्या डि.ओ. नुसार वितरण करण्याचे काम केले जात असल्याचे पंचांसमक्ष सांगितले. अधिकाऱ्यांनी गोदाम क्र. १ व २ मधील कडधान्याच्या साठयाची मोजदाद केली असता पुढील प्रमाणे कडधान्याचा साठा आढळून आला.

गोदाम क्र. १

| अ.क्र. | कडधान्याचा प्रकार | साठा तपशिल (किलो) | साठा तपशिल (क्विं.) |
|---|---|---|---|
| १ | चणा (अर्जुन) | ३००० | ३० |
| २ | चणा (ऑस्ट्रेलियन) | ९७५५० | ९७५.५० |
| ३ | काळा उडीद | ३१५००० | ३१५० |
| ४ | वाटाणा | ६०००० | ६०० |
| ५ | कडधान्य खराब (मिक्स) | १३५० | १३.५० |
| | एकुण | ४७६९०० | ४७६९ |

गोदाम क्र. २

| अ.क्र. | कडधान्याचा प्रकार | साठा तपशिल (किलो) | साठा तपशिल (क्विं.) |
|---|---|---|---|
| १ | मूग | १९२००० | १९२० |
| २ | उडीद | १२०००० | १२०० |
| ३ | मसूर | १७६०० | १७६ |
| ४ | वाटाणा | ७५०० | ७५ |
| ५ | कडधान्य खराब (मिक्स) | ६२५० | ६२.५० |
| | एकुण | ३४३३५० | ३४३३.५० |

गोदाम क्र १ व २ मध्ये आढळलेला कडधान्याचा एकुण साठा

| अ.क्र. | गोदाम | साठा तपशिल (किलो) | साठा तपशिल (क्विं.) |
|---|---|---|---|
| १ | गोदाम क्र १ | ४७६९०० | ४७६९ |
| २ | गोदाम क्र २ | ३४३३५० | ३४३३.५० |
| | एकुण साठा | ८२०२५० | ८२०२.५० |

तद्नंतर अधिकाऱ्यांनी उपस्थित इसम प्रशांत प्रभाकर चांदळे यांच्याकडे अधिक विचारणा केली असता त्यांनी सदर ठिकाणी श्री सिध्दीविनायक लॉजिस्टिक या नावाने गुमास्ता परवाना काढल्याचे सांगुन त्यांनी संबंधित आयातदार कंपनीचे आयात बिलांच्या छायांकीत प्रती (बिल ऑफ एन्ट्री फॉर होम कन्झम्शन) व संबंधित कंपनीने पनवेल तहसिलदार यांच्याकडे जमा केलेल्या मासिक विवरणपत्राच्या प्रती सादर केल्या. मात्र आयातदार कंपनीच्या लायसन्सची प्रत त्याचेकडे उपलब्ध नव्हती. याबाबत त्यांनी त्यांच्या नमुद गोदामामधील आढळून आलेल्या

CONTROLLER OF RATION

कडधान्याच्या साठयाबाबतची अधिक माहिती संबंधीत कंपनी खुलासा करु शकेल असे सांगितले. याबाबत प्रशांत प्रभाकर चांदळे यांचा लेखी जबाब पंचांसमक्ष नोंदवून घेण्यात आलेला आहे.

घटनास्थळी आढळून आलेल्या कडधान्याच्या साठयाबाबत मे. श्री सिध्दीविनायक लॉजिस्टिक या नावाने लोडींग-अनलोडींग सर्व्हिस प्रोव्हायडरचे प्रोप्रायटर प्रशांत प्रभाकर चांदळे यांनी शिधावाटप यंत्रणेचा कोणताही परवाना सादर केलेला नाही. तसेच कडधान्य आवक करणारी आयातदार कंपनी मे. डी. सी. एम. श्रीराम कन्सोलीडेट लि. यांचेकडे अधिक चौकशी करणे आवश्यक असल्याने घटनास्थळी आढळून आलेला कडधान्याचा साठा अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष जागीच सिलबंद करुन उपस्थित प्रशांत प्रभाकर चांदळे यांचेकडे सुपूर्दनाम्याद्वारे ताब्यात देण्यात येवून सदर साठा पुढील आदेशापर्यंत जैसे थे स्थितीत ठेवण्याच्या सुचना पंचांसमक्ष देण्यात आल्या.

तपासणीदरम्यान सदर गोदामामध्ये आढळून आलेल्या मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. या कंपनीचे बिल ऑफ एन्ट्री च्या तीन छायांकित प्रतींवर अनुक्रमे दिनांक २३/०३/२०११, २३/०३/२०११ व १०/०९/२०११ या तारखा नमुद असुन त्यावर एकुण १९१७.१५ क्विंटल ग्रिन मुंग चा साठा तसेच १९३.५९५ मेट्रीक टन म्हणजेच १९३५.९५ क्विंटल यलो पीस असा साठा नमुद आहे तसेच मे. नरेंद्र फॉवर्डर्स प्रा.लि. यांच्या ट्रान्सपोर्ट बिल्टी नुसार वरील नमुद साठयापैकी फक्त यलो पीस चा साठा दिनांक २१/०९/२०११ रोजी नमुद गोदामावर साठवणूक केल्याचे दिसुन येत आहे. तसेच बिल ऑफ एन्ट्री वरील नमुद ग्रिन मुगचा साठा १९१७.१५ क्विंटल असुन प्रत्यक्ष गोदामामध्ये १९२० क्विंटल मुगचा साठा आढळुन आला आहे. या व्यतिरीक्त आढळून आलेल्या इतर कडधान्याच्या साठयाचे पुरावादर्शक कागदपत्रे घटनास्थळी तपासणीच्या वेळी उपलब्ध करुन देण्यात आले नाही. यावरुन जप्त करण्यात आलेला ग्रिन मुगचा साठा हा सुमारे एक वर्षापासुन तसेच यलो पीसचा साठा सुमारे पाच महिन्यापासुन साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत आहे.

उपरोक्त नमुद जप्त करण्यात आलेला कडधान्याचा साठा हा आयातदार यांच्या गोदामात साठवणूक केलेला नसुन तो मे. श्री सिध्दीविनायक लॉजिस्टिक, डायमंड वेअर हाऊस, प्लॉट नं. डी-२०२, मंगलमुर्ती पेट्रोलपंपाजवळ, दहिसर मोरी, पनवेल रोड, नवी मुंबई या ठिकाणी असलेल्या गोदामात साठवणुक केल्याचे आढळुन आले आहे. मे. श्री सिध्दीविनायक लॉजिस्टिक चे मालक प्रशांत प्रभाकर चांदळे यांचा कडधान्य या जीवनावश्यक वस्तुंच्या साठवणुकीचा व्यवसाय असुन त्यांनी त्यांच्या नमुद गोदामावर महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडिटीज होलसेल डिलर्स लायसन्सिंग ऑर्डर, १९९८ अन्वये साठवणुकीकरीता परवाना घेतला नसल्याचे तसेच त्याकरीता अर्जही केला नसल्याचे तसेच घटनास्थळी मे. श्री सिध्दीविनायक लॉजिस्टिक चे मालक व आयातदार कंपनी यांच्या मधील साठवणुकीबाबतचा करारनामाही उपलब्ध नसल्याचे आढळून आले आहे. ही बाब गंभीर आहे.

अशाप्रकारे मे. श्री सिध्दीविनायक लॉजिस्टिक, डायमंड वेअर हाऊस, प्लॉट नं. डी-२०२, मंगलमुर्ती पेट्रोलपंपाजवळ, दहिसर मोरी, पनवेल रोड, नवी मुंबई चे मालक प्रशांत प्रभाकर चांदळे यांनी नमुद गोदामावर

मोठया प्रमाणावर साठवणुक केलेला विनापरवाना कडधान्याचा साठा हा साठेबाजी करण्याच्या उद्देशाने असल्याचे दिसुन आल्याने तसेच दि महाराष्ट्र होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर १९९८ व पर्यायाने जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ मधील तरतुदींचा भंग केल्याचे निदर्शनास आल्याने अधिकाऱ्यांनी पुढील तपासणीचे अधिन राहून उपरोक्त नमूद जीवनावश्यक वस्तूंचा साठा घटनास्थळीच जप्त केला आहे.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी केलेली असून जीवनावश्यक वस्तुंमधील डाळी/कडधान्य या अनुसूचीत वस्तूंचा साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक केलेला विनापरवाना साठा शासनजमा का करण्यात येवू नये ? याबाबत वाचावे क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दि.०७/०३/२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०७/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. श्री सिध्दीविनायक लॉजिस्टिकचे मालक प्रशांत प्रभाकर चांदळे हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ४ अन्वये लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीस साठा मालक यांच्या पैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, साठा मालक यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २०/०३/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २०/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. यांच्या वतीने निखिल जे. पुणेवाला हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ५ अन्वये सादर केलेल्या लेखी निवेदनासोबत आयात केलेला बिल ऑफ एन्ट्री व बिल ऑफ लेडिंगची छायांकित प्रत सादर करुन जप्त करण्यात आलेल्या साठ्यापैकी गोदाम क्र. १ व २ मधील वाटाण्याचा साठा तसेच गोदाम क्र. २ मधील मुग व उडिद या कडधान्याचा साठा हा त्यांचा मालकीचा असल्याचे सांगून उर्वरित जप्त करण्यात आलेल्या साठ्याशी त्यांचा काहीही संबंध नसल्याचे सांगितले.

मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. यांनी त्यांचा जप्त करण्यात आलेला गोदाम क्र. २ मधील हिरवे मुग या कडधान्याचा १९२०.०० क्विंटल व उडीद या कडधान्याचा १२०० क्विंटल साठ्याच्या पुराव्यादाखल सादर केलेली कागदपत्रे पडताळली असता, आयात केलेला हिरवे मुग या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ७७८४१७ दिनांक २३/०३/२०११ रोजी एकूण २४०० बाचक्यांमध्ये ११९८.७२ क्विंटल व बिल ऑफ एन्ट्री क्र. ७७८४७१ दिनांक २३/०३/२०११ रोजी एकूण १४४० बाचक्यांमध्ये ७१८.४३ क्विंटल असे मिळून एकूण ३८४० बाचक्यांमध्ये १९१७.१५ क्विंटल हिरवे मुग तसेच बिल ऑफ एन्ट्री क्र. ७३५२५९ दिनांक २४/०२/२०११ रोजी एकूण २४०० बाचक्यांमध्ये १२०१.८४ क्विंटल उडीद या कडधान्याचा साठा आयात केल्याचे उपलब्ध आयात संबंधीचे कागदपत्रावरुन दिसून येत आहे. काळे उडिदचा साठा प्रति किलो रुपये ४३/- व हिरवे मुगचा साठा प्रति किलो रुपये ५५/- या दराने आयात केल्याचे बिल ऑफ एन्ट्रीवरुन दिसून येते. मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. यांनी त्यांचा जप्त करण्यात आलेला हिरवे मुग व उडीद या कडधान्याचा साठा अनुक्रमे दिनांक ०२/०४/२०११ व

CONTROLLER OF RATIONING

२६/३/२०११ रोजी साठवणूक केलेला साठा नमूद वेअरहाऊसमध्ये सुमारे १ वर्षापासून आजमितीस आहे त्या स्थितीत साठवणूक व जतन करुन ठेवण्याचे प्रयोजन काय ? ही बाब गंभीर असून याबाबत खुलासा होणे आवश्यक असल्याने तसेच गोदाम क्र. १ मधील चणा, काळा उडिद व मिक्स कडधान्य तसेच गोदाम क्र. २ मधील मसुर व मिक्स कडधान्यांचा साठा हा कोणाच्या मालकीचा आहे ? याबाबत या कार्यालयास अद्याप अवगत झाले नसल्याने मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. यांचा काळे उडिद व हिरवे मुग या साठ्याबाबत तसेच उर्वरीत साठा हा कोणाच्या भालकीचा आहे याबाबत अधिक खुलासा होणे आवश्यक असल्याने पुढील सुनावणी दिनांक ०२/०५/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०२/०५/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. या कंपनीचे मॅनेजर ऑपरेशन श्री नितीन गुप्ता, मे परमानंद ॲण्ड सन्स फुड प्रा.लि. या कंपनीच्या वतीने प्राधिकृत केलेले प्रतिनीधी म्हणून श्री सुभाष सुरजभान व मे एम एस एल इंपेक्स प्रा.लि. चे एक्झीकेटीव्ह डायरेक्टर श्री. शिवनेश सौंदर यानी उपस्थित राहून कंपनीचे स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. तथापि, सुनावणीस उपस्थित कंपन्यांच्या प्रतिनिधीनी जप्त साठ्याच्या मालकीचा दावा केलेला साठा वगळता उर्वरीत जप्त साठ्याचे मालक हे सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. सबब, संबंधीतांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी अंतिम सुनावणी दि.१४/०५/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १४/०५/२०१२ रोजीच्या सुनावणीस उर्वरीत साठ्याचे मालक म्हणून मे. इंडिसन ॲग्रो फुड चे मॅनेजर श्री. गजेंद्रसींग राठोड व मे. ताज ॲग्रो कमोडीटीज प्रा.लि. यां कंपनीच्या वतीने प्राधिकृत केलेले श्री हरेश भानुशाली यांनी उपस्थित राहून त्यांच्या कंपनीच्या वतीने स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. सदर सुनावणीस उपस्थितांना गोदाममालका बरोबरच्या करारनाम्याबाबत विचारणा केली असता तसा करारनामा केला नसल्याचे सांगीतले. तसेच ते मागणी करत असलेल्या साठ्याबाबतचे कॅारंटाइन सर्टीफीकेट सादर करण्याबाबत सुचना दिल्या असता ते सद्य:स्थितीत त्यांचेकडे उपलब्ध नसल्याचे सांगीतले.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

<u>युक्तिवाद</u> :-

मे. श्री सिध्दीविनायक लॉजिस्टिक यांचे दिनांक २९/०२/२०१२ रोजीच्या टपालामार्फत प्राप्त लेखी निवेदनात, त्यांनी दरमहा त्यांचे संपूर्ण मालाची उलाढाल आपणांस वेळच्यावेळी नमूद करतो. त्याची प्रत सुध्दा निवेदनासोबत जोडली आहे. तरी त्यांच्या वखाराच्या मालावरची जप्ती लवकरात लवकर हटवावी, अशी विनंती केलेली आहे.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE

दिनांक ०७/०३/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित राहीलेले मे. श्री सिध्दीविनायक लॉजिस्टिकचे मालक प्रशांत प्रभाकर चांदळे यांनी युक्तीवाद केला की, त्यांनी यापूर्वी दि.२७/०२/२०१२ रोजी सादर केलेल्या निवेदनासोबत कागदपत्रे जोडण्यात आली आहे. ते आयातदार नसून गोडाऊन केअर टेकर असल्याचे सांगून आयात केलेल्या कार्गोच्या हाताळणीकामी प्रति बाचके प्रति माह रुपये ५/- असे दर आकारले जात असून वितरण व खरेदीबाबतचे सर्व व्यवहार आयातदार करीत असल्याने पुढील माहितीकरिता आयातदारास सुनावणीमध्ये हजर राहण्याच्या सुचना देण्यात येतील, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २०/३/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. या कंपनीच्या वतीने निखील जे पुणेवाला यांनी युक्तीवाद केला की त्यांचा नमुद गोडावूनमध्ये आयात केलेला तूर, मुग, उडिद याची माहिती ते दर महिन्याला स्टॉक रिपोर्ट चर्चगेट ऑफिसला व पनवेल रेशनिंग ऑफिसला देत असल्याचे सांगून तसे निवेदनासोबत त्यांनी चर्चगेट रेशनिंग कार्यालयातील व पनवेल येथील सही शिक्का असलेले स्टॉक स्टेटमेंट झेरॉक्स प्रत जोडत असल्याचे संगीतले तसेच माल अयात केल्याचा पुरावा म्हणून बी.एल. ची कॉपी जोडत असल्याचे सांगून गोडावून व्यावस्थापनेला त्यांच्या डी.सी.एम. मालाची डिलिव्हरीसाठी परवानगी द्यावी, अशी विनंती करुन तसे कंपनीचे लेखी निवेदन सादर केले. तसेच दिनांक ०२/०५/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. डीसीएम श्रीराम कन्सोलिडेटेड लि. या कंपनीच्या वतीने श्री. नितीन गुप्ता यांनी युक्तीवाद केला की, त्यांच्या कंपनीने कडधान्याचा साठा सन २०१०-२०११ या वर्षामध्ये बिल ऑफ एन्ट्री अन्वये बाहेरुन आयात केलेला साठा मुंबई येथे दाखल झाला. त्यांच्याकडे मुंबईत साठवणूकची सुविधा नसल्याने ते मे श्री सिध्दीविनायक लॅाजीस्टीक, दहीसर मोरी, जुना मुंब्रा पनवेल रोड, तळोजा येथील डायमंड वेअर हाऊस या गोदामात साठवणूक करुन गोदाम मालकास याबाबतची रक्कम अदा केली जात असल्याचे सांगीतले. आयात केलेला कडधान्याचा साठा हा व्यवसायासाठी केला असून त्यामध्ये भरपूर रक्कम गुंतविल्यानंतर काही प्रमाणात नफा होत असल्याचे सांगून दुर्भाग्याने सदरचा मुग व काळे उडीदचा साठा हा अपेक्षेप्रमाणे विक्री न झाल्याने तो नमूद गोदामावर पडून असल्याचे सांगितले. नियमानुसार नमूद गोदामात साठवणूक केलेल्या साठ्याची माहिती मासिक विवरणपत्राद्धारे या कार्यालयात व पनवेल येथील कार्यालयात सादर करीत असल्याचे सांगून त्याची स्थळप्रत त्यांच्याकडे उपलब्ध असल्याचे सांगितले. या बाबींवरुन आपणांस समाधान होईल की त्यांचा गैरमार्गाने जीवनावश्यक वस्तूंच्या साठवणूकीचा उद्देश नसून ज्यामुळे मालाचा कमी पुरवठा झाल्याने तोच माल जास्त किंमतीवर विकत नसल्याचे सांगून त्यांचे सर्व अभिलेख पारदर्शक असल्याचे सांगितले. मुग व काळे उडीद या कडधान्याचा साठा अपेक्षीत भाव न मिळाल्याने विक्री होऊ शकला नाही तसेच सदर दोन्ही कडधान्याचा साठ्याचे खरेदीदर हे बाजारदरापेक्षा अधिक असल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून अद्याप साठा विक्री केला नसल्याचे सांगीतले. सदरचा साठा हा नाशवंत असल्याने सद्य:स्थितीत तात्काळ

CONTROLLER OF RATIONING ... HEA

मुक्त केल्यास तो वाजवी दराने विक्री करण्यात येईल असे सांगीतले. सदरचा साठा त्यांनी अथक प्रयत्न करुनही काही कारणास्तव विक्री होत नसल्याचे सांगून पुरावादाखल सदर कालावधीचा दरतक्ता जोडण्यात आला आहे. सदरचा साठा हा अंतीम उत्पादित नसल्याने व्यापाऱ्यांना यापेक्षा कमी दरात अंतीम उत्पादित साठा बाजारात उपलब्ध असल्याने त्यांनी विक्री केला नसल्याचे सांगितले. सदर साठ्यासाठी योग्य खरेदीदार मिळाला नसल्याने त्यांनी विक्री केला नसल्याने त्यांचा साठ्याबाजी अथवा जादा नफेखोरीचा उद्देश नसून त्यांचा प्रामाणिक हेतू असल्याने जप्त करण्यात आलेला साठा मुक्त करण्यात यावा. जेणेकरुन सदरचा साठा लवकरात लवकर विक्री करण्यात येईल. तसेच त्यांचा जप्त असलेल्या साठ्याबाबत हमी देण्यात येते की, ते कोणत्याही साठेबाजीच्या प्रक्रियेत अथवा त्यामुळे होणाऱ्या कृत्रिम भाववाडीच्या प्रक्रियेत सहभाग होणार नसल्याचे हमी देत असल्याने त्यांचा प्रामाणिक व्यवसाय गृहित धरुन जप्त करण्यात आलेला कडधान्याचा साठा मुक्त करण्याची विनंती केली.

दिनांक ०२/०५/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे परमानंद ॲण्ड संन्स फुड प्रा.लि. या कंपनीच्या वतीने श्री सुभाष सुरजभान यांनी युक्तीवाद केला की, त्यांच्या कंपनीने चणा या कडधान्याचा साठा बील ऑफ एन्ट्री क्र. ५९२५०२४ दि.१४/२/२०१२ व दि.१५/२/२०१२ अन्वये एकूण ११९३२ बाचक्यांमधील ६१६८.६० क्विंटल आयात करुन श्री सिध्दीविनायक लॉजीस्टीक या गोदामात साठवणूक केल्याचे सांगून त्यापैकी दि.२०/२/२०१२ व २१/२/२०१२ रोजी १००११ बाचक्यांमधील ५१५५.३० क्विंटल साठा हा कारगोमधून त्यांच्या दिल्ली येथील मीलमध्ये पुढील प्रक्रीयेसाठी पाठविण्यात आला असल्याचे सांगीतले. तसेच उर्वरीत १९२१ बाचक्यांमधील १०१३.३० क्विंटल साठा नमुद गोदामात शिल्लक असल्याचे सांगून त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन ज़प्त करण्यात आलेला त्यांचा साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०२/०५/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. एम एस एल इंपेक्स प्रा.लि. चे एक्झीक्युटीव्ह डायरेक्टर श्री शिवनेश सौंदर यांनी युक्तीवाद केला की त्यांच्या कंपनीने मसुर या कडधान्याचा साठा बील ऑफ एन्ट्री क्र. ५५६७९४४ दि.७/१/२०१२ अन्वये एकूण १४६४ बाचक्यांमधील ७४३.८० क्विंटल, बील ऑफ एन्ट्री क्र. ५६१७६१२ दि.१३/१/२०१२ अन्वये एकूण ३७७६ बाचक्यांमधील १९९३.६० क्विंटल, बील ऑफ एन्ट्री क्र. ५६१७६१३ दि.१४/१/२०१२ अन्वये एकूण २४२५ बाचक्यांमधील १२४५.४० क्विंटल, व बील ऑफ एन्ट्री क्र. ५७४१८९१ दि.१५/१/२०१२ अन्वये एकूण ९७० बाचक्यांमधील ४९७.९० क्विंटल असे मिळून एकूण ८६३५ बाचक्यांमधील ४४८०.७० क्विंटल साठा आयात करुन श्री सिध्दीविनायक लॉजीस्टीक या गोदामात साठवणूक केल्याचे सांगून त्यापैकी दि.८/२/२०१२ ते १६/२/२०१२ या कालावधीत ८२८२ बाचक्यांमधील ४३२१.३० क्विंटल साठा हा कारगोमधून त्यांच्या विविध व्यापाऱ्यांना विक्री केल्याचे सांगीतले. तसेच उर्वरीत ३५२ बाचक्यांमधील १५९.४० क्विंटल साठा तसेच नमुद गोदामात २७ बाचक्यांमधील १३.५० क्विंटल मिक्स साठा शिल्लक असल्याचे

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE BAI

सांगून त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन जप्त करण्यात आलेला त्यांचा साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १४/५/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे इंडिसन ॲग्रो फुड्स लि. चे मॅनेजर म्हणून श्री गजेंद्रसिंग राठोड यांनी उपस्थित राहून युक्तीवाद केला की, त्यांच्या कंपनीने काळे उडीद या कडधान्याचा साठा बील ऑफ एन्ट्री क्र. ५१७५२९७ दि.२४/१२/२०११ अन्वये एकूण २४०० बाचक्यांमधील ११९५.०० क्विंटल साठा आयात करुन श्री सिध्दीविनायक लॉजीस्टीक या गोदामात साठवणूक केल्याचे सांगून त्यापैकी दि.८/२/२०१२ व २२/२/२०१२ रोजी ९६० बाचक्यांमधील ४७७.७० क्विंटल साठा हा कारगोमधून त्यांच्या विविध व्यापाऱ्यांना विक्री केल्याचे सांगीतले. तसेच उर्वरीत १४४० बाचक्यांमधील ७१७.३० क्विंटल साठा नमुद गोदामात शिल्लक असल्याचे सांगून त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन जप्त करण्यात आलेला त्यांचा साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १४/५/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे ताज ॲग्रो कमोडीटीज प्रा.लि. चे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून श्री हरेष भानुशाली यांनी उपस्थित राहून युक्तीवाद केला की, त्यांच्या कंपनीने काळे उडीद या कडधान्याचा साठा बील ऑफ एन्ट्री क्र. ४८७०६४५ दि.१९/१०/२०११ अन्वये एकूण २४०० बाचक्यांमधील ११९८.७० क्विंटल, बील ऑफ एन्ट्री क्र. ५३२३६९७ दि.२२/१२/२०११ अन्वये एकूण २४०० बाचक्यांमधील ११९६.२० क्विंटल असा एकूण ४८०० बाचक्यामधील २३९४.९० क्विंटल साठा आयात करुन श्री सिध्दीविनायक लॉजीस्टीक या गोदामात साठवणूक केल्याचे सांगून सदर साठ्याबाबत मासिक विवरणपत्र सादर केल्याचे सांगीतले. तरी त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन जप्त करण्यात आलेला त्यांचा साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

## निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक २४/०२/२०१२ रोजी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे हे पथकासमवेत डायमंड वेअर हाऊस, प्लॉट नं. डी-२०२, मंगलमुर्ती पेट्रोलपंपाजवळ, दहिसर मोरी, पनवेल रोड, नवी मुंबई या ठिकाणी भेट देऊन डावीकडे व उजवीकडे असलेल्या दोन्ही गोदामामध्ये उपस्थित इसम प्रशांत प्रभाकर चांदळे याचेकडे गोदामामधील साठवणूक केलेल्या कडधान्याच्या साठ्याबाबत विचारणा केली असता, सदर ठिकाणी ते डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. या

CONTROLLER OF RATIONING HEA M

कंपनीसाठी लोडींग-अनलोडींग सर्व्हिस प्रोव्हायडर म्हणुन गेल्या १ वर्षापासुन काम करीत असल्याचे सांगुन वर नमूद कंपनीने इंपोर्ट केलेल्या कडधान्याचा माल साठवणूक करुन कंपनीने दिलेल्या डि.ओ. नुसार वितरण करण्याचे काम केले जात असल्याचे पंचांसमक्ष सांगितले. अधिकाऱ्यांनी गोदाम क्र. १ व २ मधील कडधान्याच्या साठयाची मोजदाद केली असता, गोदाम क्र. १ मध्ये ४७६९ क्विंटल तसेच गोदाम क्र. २ मध्ये ३४३३.५० क्विंटल असे एकूण ८२०२.५० क्विंटल विविध कडधान्यांचा साठा साठवणूक केल्याचे आढळून आले. नमुद गोदामामधील आढळून आलेल्या कडधान्याच्या साठयाबाबतची अधिक माहिती संबंधीत कंपनी खुलासा करु शकेल असे सांगितले. याबाबत प्रशांत प्रभाकर चांदळे यांचा लेखी जबाब पंचांसमक्ष नोंदवून घेण्यात आलेला आहे. अधिकाऱ्यांनी घटनास्थळी आढळून आलेल्या कडधान्याच्या साठयाबाबत मे. श्री सिध्दीविनायक लॉजिस्टिक या नावाने लोडींग-अनलोडींग सर्व्हिस प्रोव्हायडरचे प्रोप्रायटर प्रशांत प्रभाकर चांदळे यांनी शिधावाटप यंत्रणेचा कोणताही परवाना सादर केलेला नाही. तसेच कडधान्य आवक करणारी आयातदार कंपनी मे. डी. सी. एम. श्रीराम कन्सोलीडेट लि. यांचेकडे अधिक चौकशी करणे आवश्यक असल्याने घटनास्थळी आढळून आलेला कडधान्याचा साठा अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष जागीच सिलबंद करुन उपस्थित प्रशांत प्रभाकर चांदळे यांचेकडे सुपूर्दनाम्याद्वारे ताब्यात देण्यात येवून सदर साठा पुढील आदेशापर्यंत जैसे थे स्थितीत ठेवण्याच्या सुचना पंचांसमक्ष देण्यात आल्या.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२२२७ (अ), दिनांक २७ सप्टेंबर, २०११ अन्वये डाळी/कडधान्य व खाद्यतेल या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१२ पर्यंत निर्बंध आहेत. तथापी, "Central Government or State Government may direct the Importers to declare the receipts of stocks of these commodities and stocks retained by them" असे निर्देश दिलेले आहेत. तसेच शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २००८ अन्वये डाळीसाठी साठा मर्यादा व परवाना घेण्याची आवश्यकता याबाबत लागू केलेले निर्बंध हे आयात केलेल्या डाळींसाठी लागू राहणार नाहीत. त्यामुळे आयात केलेल्या डाळींच्या साठवणूक व प्रक्रियेसाठी व्यापाऱ्यांना परवाना घेण्याची आवश्यकता नाही. तथापी, त्यांनी आयात केलेल्या डाळीची खरेदी विक्री केल्यास यापुढे पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी/उपनियंत्रक शिधावाटप यांचेकडे रिटर्न्स भरावेत. रिटर्न्स भरतांना त्यामध्ये कंपनीच्या मालकाचे नांव, नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता, गोदामाचा पत्ता, सुरुवातीची शिल्लक, आयात केलेल्या डाळीचा तपशिल, विक्री केलेल्या डाळीचा तपशिल, शिल्लक साठा इत्यादींचा स्पष्ट उल्लेख असावा असे नमूद आहे. तसेच आयात डाळीची विक्री करताना पावतीवर " Imported pulses " असा स्पष्ट उल्लेख करावा व आयात केलेल्या डाळीवरील क्रमांक व दिनांक पावतीवर स्पष्टपणे नमूद करुन बिल ऑफ एन्ट्रीची एक सत्य प्रत संबंधितांना द्यावी, असे नमूद आहे.

& DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
OFFICE
MBAI

मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. यांनी या प्रकरणी त्यांचा जप्त करण्यात आलेल्या पिवळे वाटाण्याचा साठा आयात केल्याबाबत या कार्यालयास मासिक विवरणपत्र नियमितपणे सादर करुन उपरोक्त आयात साठ्याबाबतचे सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केलेले असल्यावरुन मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. यांचा आयात केलेला साठा हा नजिकच्या कालावधीतला तसेच वैध असल्याचे सकृतदर्शनी दिसून आल्याने मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. यांचा सिल करण्यात आलेला पिवळे वाटाणा या कडधान्यांचा संपूर्ण साठा या कार्यालयाचे आदेश क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.१३/२०१२/जा.२५२ दिनांक १९/०४/२०१२ अन्वये मुक्त करण्यात आला आहे.

मे. श्री सिध्दीविनायक लॉजिस्टिकचे मालक प्रशांत प्रभाकर चांदळे यांनी केलेल्या खुलाशात, त्यांनी दरमहा त्यांचे संपूर्ण मालाची केलेल्या उलाढालीबाबत या कार्यालयास वेळच्यावेळी कळविले असल्याचे सांगितले. तसेच ते आयातदार नसून गोडाऊन केअर टेकर असल्याचे सांगून आयात केलेल्या कार्गोच्या हाताळणीकामी प्रति बाचके प्रति माह रुपये ५/- असे दर आकारले जात असून वितरण व खरेदीबाबतचे सर्व व्यवहार आयातदार करीत असल्याचे सांगितले आहे. तसेच मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. यांनी केलेल्या खुलाशात, त्यांचा मे. सिध्दीविनायक लॉजिस्टिक या गोडावूनमध्ये तुर, मुग, उडिद या कडधान्याची साठवणूक केल्याचे सांगून आयात केलेले तूर, मुग, उडिद याची माहिती ते दर महिन्याला स्टॉक रिपोर्ट या कार्यालयास सादर केल्याचे सांगितले आहे.

प्रस्तूत प्रकरणी, मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. यांनी खुलाशामध्ये नमूद गोदामावर तुर, मुग व उडिद या कडधान्यांच्या साठ्याची साठवणूक केल्याचे नमूद केले आहे. तथापी, निवेदनासोबत सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, त्यांनी जप्त साठ्यापैकी पिवळे वाटाणा, हिरवे मुग व काळे उडिद या कडधान्यांचा साठा त्यांनी आयात केल्याचे सादर केलेल्या बिल ऑफ एन्ट्रीवरुन दिसून येत आहे. म्हणजेच त्यांनी निवेदनामध्ये नमूद केलेल्या तुर या कडधान्याचा साठा घटनास्थळी असलेल्या गोदामावर साठवणूक केल्याचे आढळून येत नसून बिल ऑफ एन्ट्रीवरील पिवळे वाटाणा या कडधान्याच्या साठ्याबाबत त्यांनी निवेदनामध्ये काहीच भाष्य केले नसल्याने या कार्यालयास सादर केलेले त्यांचे निवेदन हे मोघम स्वरुपाचे व दिशाभूल करणारे आहे.

मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. यांनी त्यांचा जप्त करण्यात आलेला गोदाम क्र. २ मधील हिरवे मुग या कडधान्याचा १९२०.०० क्विंटल व उडीद या कडधान्याचा १२०० क्विंटल साठ्याच्या पुराव्यादाखल सादर केलेली कागदपत्रे पडताळली असता, आयात केलेला हिरवे मुग या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ७७८४१७ दिनांक २३/०३/२०११ रोजी एकूण २४०० बाचक्यांमध्ये ११९८.७२ क्विंटल व बिल ऑफ एन्ट्री क्र. ७७८४७१ दिनांक २३/०३/२०११ रोजी एकूण १४४० बाचक्यांमध्ये ७१८.४३ क्विंटल असे मिळून एकूण ३८४० बाचक्यांमध्ये १९१७.१५ क्विंटल हिरवे मुग तसेच बिल ऑफ एन्ट्री क्र. ७३५२५९ दिनांक २४/०२/२०११ रोजी

CONTROLLER OF RATIONING
HEAD

एकूण २४०० बाचक्यांमध्ये १२०१.८४ क्विंटल उडीद या कडधान्याचा साठा आयात केल्याचे उपलब्ध आयात संबंधीचे कागदपत्रावरुन दिसून येत आहे. मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. यांनी आयात केलेल्या साठ्यापैकी साठा विक्रीचे तपशिल तसेच घटनास्थळी नमूद गोदामावर साठवणूक केल्याचे दिनांक व साठा याबाबतची माहिती त्यांनी सादर केलेली नाही. तथापी, मे. सिध्दीविनायक लॉजिस्टिक यांनी त्यांच्या स्तरावर साठापुस्तक म्हणून ठेवण्यात आलेल्या अभिलेख्याची पडताळणी केली असता, मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. यांनी हिरवे मुगचा २४०० बाचक्यांमधील ११९८.४० क्विंटल व १४४० बाचक्यांमधील ७१७.५० क्विंटल असा मिळून एकूण ३८४० बाचक्यांमधील १९१५.९० क्विंटल हिरवे मुगचा साठा दिनांक ०२/०४/२०११ रोजी व उडिदचा २४०० बाचक्यांमधील ११९८.९० क्विंटल साठा दिनांक २६/०३/२०११ रोजी वेअरहाऊसमध्ये साठवणूक केल्याचे नमुद आहे. शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २००८ अन्वये माहे नोव्हेंबर २०११ ते माहे फेब्रुवारी २०१२ या चार महिन्याचे मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. यांनी या कार्यालयास सादर केलेल्या मासिक विवरणपत्रांच्या छायांकित प्रतिंचे अवलोकन करता मे. श्री सिध्दीविनायक लॉजिस्टिक या वेअरहाऊसमध्ये साठवणूक केलेला हिरवे मुग या कडधान्याचा साठ्यापैकी माहे नोव्हेंबर २०११ ते माहे फेब्रुवारी २०१२ या कालावधीत एकूण १२०२० बाचक्यांमध्ये ५९४१.९० क्विंटल साठा शिल्लक असल्याचे नमूद आहे. म्हणजेच मासिक विवरणपत्रामध्ये दर्शविण्यात आलेला ५९४१.९० क्विंटल साठ्यापैकी प्रत्यक्षात नमूद गोदामावर १९२०.०० क्विंटल साठा साठवणूक केल्याचे दिसून येते. तसेच उडीद या कडधान्याच्या साठ्यापैकी माहे नोव्हेंबर २०११ ते माहे फेब्रुवारी २०१२ या कालावधीत एकूण ४७९९ बाचक्यांमध्ये २४००.३ क्विंटल साठा शिल्लक असल्याचे नमूद आहे. म्हणजेच मासिक विवरणपत्रांमध्ये दर्शविण्यात आलेला २४००.३ क्विंटल साठ्यापैकी प्रत्यक्षात नमूद गोदामवर १२००.०० क्विंटल साठा साठवणूक केल्याचे दिसून येत असून म्हणजेच हिरवे मुग या कडधान्याच्या ४०२१.९० क्विंटल साठ्याबाबत तसेच १२००.३ क्विंटल उडीद या कडधान्याच्या उर्वरीत साठ्याबाबत त्यांनी या कार्यालयास सादर केलेल्या निवेदनामध्ये काहीच भाष्य न केल्याने त्यांनी सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे व दिशाभूल करणारे आहे.

दिनांक २३/०३/२०११ रोजी उपरोक्त नमूद दोन बिल ऑफ एन्ट्रीनुसार आयात केलेला हिरवे मुगचा १९१७.१५ क्विंटल साठ्यापैकी त्यांनी दिनांक ०२/०४/२०११ रोजी १९२०.०० क्विंटल साठा तसेच उडीद या कडधान्याच्या साठ्यापैकी दिनांक २६/०३/२०११ रोजी १२००.०० क्विंटल साठा घटनास्थळी साठवणूक केल्याचे व त्याअनुषंगाने तपासणीच्या वेळी फिरते पथकाने सदरचा साठा जप्त केल्याचे दिसून येते. मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. यांनी त्यांचा जप्त करण्यात आलेला हिरवे मुग व उडीद या कडधान्याचा साठा अनुक्रमे दिनांक ०२/०४/२०११ व २६/३/२०११ रोजी साठवणूक केलेला साठा नमूद वेअरहाऊसमध्ये सुमारे १ वर्षापासून

& DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE ...BAI

आजमितीस आहे त्या स्थितीत साठवणूक व जतन करुन ठेवला असल्याचे दिसून येत आहे, ही बाब गंभीर आहे. केंद्र शासनाच्या आयात धोरणानुसार आयातदारास आयात शुल्कामध्ये १००% सुट देण्यात आली असून ज्यामुळे आयातदारांनी आयात केलेला कडधान्यांचा साठा हा जनसामान्यांच्या गरजेनुसार मुबलक प्रमाणात स्थानिक बाजारपेठेत उपलब्ध झाल्यास व सदरचा पुरवठा नियमित राहिल्यास जीवनावश्यक वस्तूंचे दर स्थिर राहून महागाईवर नियंत्रण राहण्यास मदत होते. तथापी, मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. यांनी सदरचा १९२०.०० क्विंटल हिरवे मुग व १२००.०० क्विंटल उडीद या कडधान्यांचा साठा हा साठवणूक केल्यानंतर त्यापैकी काहीच विक्री न करता साठेबाजी व नफेखोरीच्या उद्देशाने स्वत:जवळ बाळगून ठेवला असल्याने परिणामी स्थानिक बाजारपेठेत कृत्रीम टंचाई निर्माण होऊन जीवनावश्यक वस्तुंच्या भाववाढ होण्यास प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची व उपभोक्तांची फसवणूक करुन जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ च्या तरतुदींचा भंग केल्याचे सिध्द होत आहे. सबब, मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. यांचा जप्त करण्यात आलेला १९२०.०० क्विंटल हिरवे मुग व १२००.०० क्विंटल उडीदचा संपूर्ण साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

मे परमानंद ॲण्ड संन्स फुड प्रा.लि. यांनी नमुद गोदाम क्र. १ मधील चणा या साठ्याच्या पुराव्यादाखल त्यांनी बील ऑफ एन्ट्री क्र. ५९२५०२४ दि.१४/२/२०१२ व दि.१५/२/२०१२ अन्वये एकूण ११९३२ बाचक्यांमधील ६१६८.६० क्विंटल आयात केल्याचे सांगून श्री सिध्दीविनायक लॉजीस्टीक या गोदामात साठवणूक केल्याचे सांगीतले असून त्यापैकी दि.२०/२/२०१२ व २१/२/२०१२ रोजी १००११ बाचक्यांमधील ५१५५.३० क्विंटल साठा हा कारगोमधून त्यांच्या दिल्ली येथील मीलमध्ये पुढील प्रक्रीयेसाठी पाठविण्यात आला असल्याचे तसेच उर्वरीत १९२१ बाचक्यांमधील १०१३.३० क्विंटल साठा नमुद गोदामात शिल्लक असल्याचे सांगून सदर चणा या साठ्याच्या मालकीचा त्यांनी दावा केला आहे. तथापि, ते दावा करीत असलेल्या चणा या कडधान्याचा प्रत्यक्षात नमुद गोदामात फक्त १००५.५० क्विंटल साठा असल्याचे दिसून येते. आयात केलेल्या साठ्यापैकी साठा विक्रीचे तपशिल तसेच घटनास्थळी नमूद गोदामावर साठवणूक केल्याचे दिनांक व साठा याबाबतची पुरावादर्शक कागदपत्रांसह माहिती त्यांनी सादर केलेली नाही. तसेच शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २००८ अन्वये आयातदारांना आयात केलेल्या साठ्याबाबत मासिक विवरणपत्र नियमीतपणे सादर करणे आवश्यक असताना सदरबाबत त्यांनी विवरणपत्र सादर केल्याचे कोणतेही पुरावादर्शक कागदपत्रे सादर केली नसल्याने मे परमानंद ॲण्ड संन्स फुड प्रा.लि. हे मालकीचा दावा करीत असलेल्या चणा या कडधान्याचा साठा हा त्यांनी साठ्याच्या पुराव्यादाखल सादर केलेल्या कागदपत्रावरुन सदरचा साठा हा त्यांच्या मालकीचा असल्याचे सिध्द होत नाही.

CONTROLLER OF RATIONING HEAD MUM

मे. एम एस एल इंपेक्स प्रा.लि. यांनी नमुद गोदाम क्र. १ मधील मसुर या कडधान्याचा मिक्स साठा व गोदाम क्र.२ मधील मसुर या साठ्याच्या पुराव्यादाखल त्यांनी बील ऑफ एन्ट्री क्र. ५५६७९४४ दि.७/१/२०१२ अन्वये एकूण १४६४ बाचक्यांमधील ७४३.८० क्विंटल, बील ऑफ एन्ट्री क्र. ५६१७६१२ दि.१३/१/२०१२ अन्वये एकूण ३७७६ बाचक्यांमधील १९९३.६० क्विंटल, बील ऑफ एन्ट्री क्र. ५६१७६१३ दि.१४/१/२०१२ अन्वये एकूण २४२५ बाचक्यांमधील १२४५.४० क्विंटल, व बील ऑफ एन्ट्री क्र. ५७४१८९१ दि.१५/१/२०१२ अन्वये एकूण ९७० बाचक्यांमधील ४९७.९० क्विंटल असे मिळून एकूण ८६३५ बाचक्यांमधील ४४८०.७० क्विंटल साठा आयात करुन श्री सिध्दीविनायक लॉजीस्टीक या गोदामात साठवणूक केल्याचे सांगून त्यापैकी दि.८/२/२०१२ ते १६/२/२०१२ या कालावधीत ८२८२ बाचक्यांमधील ४३२१.३० क्विंटल साठा हा कारगोमधून त्यांच्या विविध व्यापाऱ्यांना विक्री केल्याचे सांगीतले. तसेच उर्वरीत ३५२ बाचक्यांमधील १५९.४० क्विंटल साठा तसेच नमुद गोदामात २७ बाचक्यांमधील १३.५० क्विंटल मिक्स साठा शिल्लक असल्याचे सांगून सदर मसुर या कडधान्याच्या साठ्याच्या मालकीचा त्यांनी दावा केला आहे. तथापि, ते दावा करीत असलेल्या मसुर या कडधान्याचा प्रत्यक्षात नमुद गोदामात फक्त १७६.०० क्विंटल साठा असल्याचे दिसून येते. आयात केलेल्या साठ्यापैकी साठा विक्रीचे तपशिल तसेच घटनास्थळी नमूद गोदामावर साठवणूक केल्याचे दिनांक व साठा याबाबतची पुरावादर्शक कागदपत्रांसह माहिती त्यांनी सादर केलेली नाही. तसेच शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २००८ अन्वये आयातदारांना आयात केलेल्या साठ्याबाबत मासिक विवरणपत्र नियमीतपणे सादर करणे आवश्यक असताना सदरबाबत त्यांनी विवरणपत्र सादर केल्याचे कोणतेही पुरावादर्शक कागदपत्रे सादर केली नसल्याने मे. एम एस एल इंपेक्स प्रा.लि.. हे मालकीचा दावा करीत असलेल्या मसुर या कडधान्याचा साठा हा त्यांनी साठ्याच्या पुराव्यादाखल सादर केलेल्या कागदपत्रावरुन सदरचा साठा हा त्यांच्या मालकीचा असल्याचे सिध्द होत नाही.

मे इंडिसन ॲग्रो फुड्स लि. यांनी नमुद गोदाम क्र. १ मधील काळे उडीद या कडधान्याचा साठ्याच्या पुराव्यादाखल त्यांनी बील ऑफ एन्ट्री क्र. ५१७५२९७ दि.२४/१२/२०११ अन्वये एकूण २४०० बाचक्यांमधील ११९५.०० क्विंटल साठा आयात करुन श्री सिध्दीविनायक लॉजीस्टीक या गोदामात साठवणूक केल्याचे सांगून त्यापैकी दि.८/२/२०१२ व २२/२/२०१२ रोजी ९६० बाचक्यांमधील ४७७.७० क्विंटल साठा हा कारगोमधून त्यांच्या विविध व्यापाऱ्यांना विक्री केल्याचे सांगीतले. तसेच उर्वरीत १४४० बाचक्यांमधील ७१७.३० क्विंटल साठा नमुद गोदामात शिल्लक असल्याचे सांगून सदर काळे उडीद या कडधान्याच्या साठ्याच्या मालकीचा त्यांनी दावा केला आहे. तसेच मे ताज ॲग्रो कमोडीटीज प्रा.लि. यांनी नमुद गोदाम क्र. १ मधील काळे उडीद या कडधान्याचा साठ्याच्या पुराव्यादाखल त्यांनी बील ऑफ एन्ट्री क्र. ४८७०६४५ दि.१९/१०/२०११ अन्वये एकूण २४००

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
FICE

बाचक्यांमधील ११९८.७० क्विंटल, बील ऑफ एन्ट्री क्र. ५३२३६९७ दि.२२/१२/२०११ अन्वये एकूण २४०० बाचक्यांमधील ११९६.२० क्विंटल असा एकूण ४८०० बाचक्यामधील २३९४.९० क्विंटल साठा आयात करुन श्री सिध्दीविनायक लॅाजीस्टीक या गोदामात साठवणूक केल्याचे सांगून सदरहू दोन्ही आस्थापनांनी काळे उडीद या कडधान्याच्या साठ्याच्या मालकीचा त्यांनी दावा केला आहे. आयात केलेल्या साठ्यापैकी साठा विक्रीचे तपशिल तसेच घटनास्थळी नमूद गोदामावर साठवणूक केल्याचे दिनांक व साठा याबाबतची पुरावादर्शक कागदपत्रांसह माहिती त्यांनी सादर केलेली नाही. तथापि, ते दावा करीत असलेल्या काळे उडीद या कडधान्याचा प्रत्यक्षात नमुद गोदामात ३१५०.०० क्विंटल साठा असल्याचे तसेच सदरचा साठा हा एकरुपाने एकच आस्थापनाचा असल्याचे घटनास्थळी मे श्री सिध्दीविनायक लॅाजीस्टीक चे मालक यानी सादर केलेल्या साठवणूकीच्या आकडेवारीवरुन दिसून येत आहे. शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २००८ अन्वये आयातदारांना आयात केलेल्या साठ्याबाबत मासिक विवरणपत्र नियमीतपणे सादर करणे आवश्यक असताना सदरबाबत मे इंडिसन ॲग्रो फुड्स लि. यांनी विवरणपत्र सादर केल्याचे कोणतेही पुरावादर्शक कागदपत्रे सादर केली नाही त्यामुळे ते मालकीचा दावा करीत असलेला काळे उडीदचा साठा व प्रत्यक्षात साठवणूक असलेला गोदामातील साठा यामध्ये बरीच तफावत असल्याने सदरचा काळे उडीदचा साठा हा त्यांच्या मालकीचा असल्याचे सिध्द होत नाही तसेच मे ताज ॲग्रो कमोडीटीज प्रा.लि. यांनी या कार्यालयास सादर केलेल्या मासिक विवरणपत्रांच्या छायांकीतप्रती सादर केल्या असून त्यावरील २३९९.४० क्विंटल काळे उडीदचा साठा नमुद असून प्रत्यक्षात नमुद गोदामात काळे उडीदचा ३१५०.०० क्विंटल जप्त असून यावरुन मे ताज ॲग्रो कमोडीटीज प्रा.लि. हे दावा करीत असलेला साठा हा साठवणूक असलेल्या साठ्यापेक्षा फारच कमी असल्याचे दिसून येत आहे. सदर काळे उडीद या कडधान्याच्या दोन्ही आस्थापनांनी मालकीचा दावा करुन व त्याच्या पुराव्यादाखल आवश्यक पुरावादर्शक कागदपत्रे सादर न करुन त्यांनी शासनाची जाणीवपूर्वक दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. तसेच मे इंडिसन ॲग्रो फुड्स लि. व मे ताज ॲग्रो कमोडीटीज प्रा.लि. हे मालकीचा दावा करीत असलेल्या काळे उडीद या कडधान्याचा साठा हा त्यांनी साठ्याच्या पुराव्यादाखल सादर केलेल्या कागदपत्रावरुन सदरचा साठा हा त्यांच्या मालकीचा असल्याचे सिध्द होत नाही.

प्रस्तुत प्रकरणी, मे श्री सिध्दीविनायक लॅाजीस्टीक चे मालक यांनी तपासणीच्या दिवशी उपस्थित पथकासमक्ष दिलेल्या जबाबात त्यांच्या नमुद गोदामातील साठवणूक केलेला संपूर्ण साठा हा मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. यांच्या मालकीचा असल्याचे सांगीतले तथापि, प्रत्यक्षात सुनावणीच्यावेळी मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. या कंपनीच्या वतीने उपस्थित प्रतिनिधीनी गोदाम क्र. १ मधील १००५.५० क्विंटल चणा, ३१५० क्विंटल काळा उडिद व १३.५० क्विंटल मिक्स कडधान्य तसेच गोदाम क्र. २ मधील १७६.०० क्विंटल मसुर व



001

६२.५० क्विंटल मिक्स कडधान्यांचा साठा हा त्यांच्या कंपनीच्या मालकीचा नसल्याचे सांगून उर्वरीत साठ्याचे मालकीबाबतचा दावा केला आहे. म्हणजेच मे. श्री सिध्दीविनायक लॉजीस्टीकचे मालक यांनी दिलेला जबाब हा शासनाची दिशाभूल व फसवणूक करणारा असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते ही गंभीर बाब आहे. तद्नंतरच्या सुनावणीमध्ये उर्वरीत साठ्याचे मालकांना पाचारण केले असता मे परमानंद ॲण्ड संन्स फुड प्रा.लि., मे. एम एस एल इंपेक्स प्रा.लि., मे इंडिसन ॲग्रो फुड्स लि. व मे ताज ॲग्रो कमोडीटीज प्रा.लि. या कंपन्यांनी उर्वरीत जप्त असलेल्या विविध कडधान्यांच्या साठ्याबाबत सादर केलेल्या पुरावादर्शक कागदपत्रांचे अवलोकन करता नमुद गोदामात त्यांनी मालकीचा दावा केलेल्या साठ्यापेक्षा प्रत्यक्षात कमी साठवणूक असल्याचे अथवा मालकीचा दावा केलेल्या साठ्यापेक्षा जास्त साठवणूक असल्याचे दिसून येते. म्हणजेच ते दावा करीत असलेल्या साठ्याचे परिमाण हे जप्त साठ्याशी जुळत नसल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असल्याने तसेच सदर कंपन्यांपैकी काहींनी शासन परिपत्रकानुसार आयात साठ्याबाबतचे मासिक विवरणपत्रही या कार्यालयास सादर केले नसल्याने प्रत्यक्षात त्यांनी सादर केलेल्या बील ऑफ एंट्री नुसार सदरचा जप्त असलेला साठा हा त्यांच्या मालकीचा असल्याचे सिध्द होत नाही. मे परमानंद ॲण्ड संन्स फुड प्रा.लि., मे. एम एस एल इंपेक्स प्रा.लि., मे इंडिसन ॲग्रो फुड्स लि. व मे ताज ॲग्रो कमोडीटीज प्रा.लि. यांनी त्यांच्या मालकीचा साठा नसतानाही फोल दावा करुन शासनाची दिशाभूल करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करुन सर्व संबंधित कंपन्यांनी केंद्र शासनाच्या अधिसुचनेचे अथवा राज्य शासनाच्या विविध परिपत्रकांचे तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे तरतूदींचा भंग केल्याचे निष्पन्न झाले आहे. सबब, गोदाम क्र. १ मधील १००५.५० क्विंटल चणा, ३१५०.०० क्विंटल काळा उडिद व १३.५० क्विंटल मिक्स कडधान्य तसेच गोदाम क्र. २ मधील १७६.०० क्विंटल मसुर व ६२.५० क्विंटल मिक्स कडधान्यांचा विना मालकीचा साठा हा शासनजमा करण्यांच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये जप्त/सिल करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात पुढील आदेश देत आहे.

<u>आदेश</u> :-

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि. यांचा १९२०.०० क्विंटल मुग व १२००.०० क्विंटल उडीद या कडधान्याचा साठा हा शासन जमा करण्यात यावा.

२) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला गोदाम क्र. १ मधील १००५.५० क्विंटल चणा, ३१५०.०० क्विंटल काळा उडिद व १३.५० क्विंटल मिक्स कडधान्य तसेच गोदाम क्र. २ मधील १७६.०० क्विंटल

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... FFICE

मसुर व ६२.५० क्विंटल मिक्स या कडधान्यांच्या साठ्याचे मालकी हक्क सिध्द न झाल्याने सदरचा साठा हा शासन जमा करण्यात यावा.

३) सदर शासनजमा करण्यात आलेला संपूर्ण कडधान्याचा साठा उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची उप नियंत्रक शिधावाटप फ परिमंडळ यांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. श्री सिध्दीविनायक लॉजिस्टिक चे मालक प्रशांत प्रभाकर चांदळे
२) मे. डीसीएम श्रीराम कन्सोलीडेट लि.
३) मे परमानंद ॲण्ड संन्स फुड प्रा.लि.,
४) मे. एम एस एल इंपेक्स प्रा.लि.,
५) मे इंडिसन ॲग्रो फुड्स लि.
६) मे ताज ऍग्रो कमोडीटीज प्रा.लि.
(उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचे मार्फत)

प्रत,

१) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.
३) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव अग्रेषित.
४) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.